महिला व बाल विकास विभागातील क्षेत्रीय स्तरावरील अधिका-यांच्या जुन्या ८ निर्लेखित वाहनांऐवजी ८ नवीन वाहने खरेदी करण्यास मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः मबाआ-२०१५/प्र.क्र.१५१/का-७अ

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
तारीख: ८ जानेवारी, २०१६.

<u>वाचा :-</u>

१) महिला व बाल विकास शासन निर्णय क्र. २०१५/प्र.क्र.२९/का-७अ दि. १ सप्टेंबर, २०१५
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र. वाहन-२०१४/प्र.क्र.९/१४/विनियम , दि. ४/८/२०१४.
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. पुरक-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थसंकल्प-३, दिनांक १ जानेवारी, २०१६
४) महिला व बाल विकास विभाग ज्ञापन क्र.जीटी-२०१५/प्र.क्र.७३/का-४, दि. ६ जानेवारी, २०१६.

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त संदर्भ १ अन्वये महिला व बाल विकास (खुद्द) व अधिनस्त कार्यालयांच्या आस्थापनेवरील वाहनांच्या आढाव्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार एकूण ४२ वाहने अनुज्ञेय करण्यात आली आहेत. त्यापैकी महिला व बाल विकास विभागातील क्षेत्रीय स्तरावरील अधिका-यांच्या जुन्या ८ निर्लेखित वाहनांऐवजी ८ नवीन वाहने खरेदी करण्यास मंजूरी देणेबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :- त्यानुसार आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ८ निर्लेखित वाहनांऐवजी ८ नवीन वाहने खरेदी करण्यास शासन मंजुरी देत आहे.

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	वाहन वापरणा-या अधिका-यांचे पदनाम	निर्लेखित केलेली वाहनांचा क्रमांक	अनुज्ञेय वाहन प्रकार
१	महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे	सह आयुक्त	एम एच १२ जेए ०६६०	कार
२	महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे	उप आयुक्त (बाल विकास)	एमएच १२ पीए ४८०८	कार
३	महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे	उप आयुक्त (महिला विकास)	एम एच १२ पीए ४८०६	कार

४	जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, ठाणे	जिल्हा महिला व बाल विकास ठाणे, अधिकारी	एमएच ०४ क्यू ७१६५	जीप
५	जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय,पुणे	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,पुणे	एमएच १२ डब्ल्यू ४८०८	जीप
६	जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय,भंडारा	जिल्हा महिला व बाल विकास ,भंडारा	एमएच ३५ ए ९९८४	जीप
७	जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय,लातूर	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,लातूर	एमएच २४ ए ७३७५	जीप
८	जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय,बीड	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,बीड	एमएच २३ बी १३३८	जीप

वरील वाहने खालील अटींच्या अधिन राहून संबंधितांना मंजूर करण्यात येत आहेत:-

१) राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने मान्यता दिल्यानुसार अनुज्ञेय वाहन दरकरारानुसार नवीन वाहने खरेदी करण्यात यावीत.

२) वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक ४/८/२०१४ च्या शासन निर्णयान्वये अन्य अधिका-यांसाठी रु. ६ लाखांच्या मर्यादेत वाहनांची खरेदी करण्यात यावी. वाहन खरेदीसाठी मंजूर केलेल्या अनुदानामध्ये वाहनांची खरेदी करण्यात यावी. वाहन खरेदीसाठी मंजूर केलेल्या अनुदानामध्ये वाहनाची किंमत व करांचा समावेश आहे.

३) नवीन वाहन ज्या अधिका-यास मंजूर करण्यात आले आहे, त्या अधिका-यांकडूनच त्याचा वापर त्याच कार्यालयाकरीता, शासकीय कामकाजासाठीच करण्यात यावा. अन्य अधिका-याकडे सदर वाहन हस्तांतरीत करण्यात येऊ नये.

४) वाहने खरेदी करुन त्यासंबंधीचा अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

५) महाराष्ट्र अर्थसंकल्पिय नियमपुस्तिकेमधील क्र. १६९ व १७० या नियमास अधीन राहून सदर वाहन खरेदीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४. सदर वाहने खरेदीचा शासन निर्णय हा उपरोक्त संदर्भ क्र.४ ज्ञापन विधानमंडळ डिसेंबर-२०१५ च्या अधिवेशनात सादर केलेल्या सन २०१५-१६ मधील खर्चाचे पुरक विवरणपत्राच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार पुरक मागणीच्या ५० % म्हणजेच रु. ४८ लक्ष पैकी २४ लक्ष च्या निधीच्या वितरणास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. ५२०/२०१५ /विनियम, दिनांक १७/१०/२०१५ व अनौपचारिक संदर्भ क्र.६९५/व्यय-६, दिनांक ५/११/२०१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११६१५३८१५४४३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahendra Babusing Hajari

Digitally signed by Mahendra Babusing Hajari
DN: CN = Mahendra Babusing Hajari, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Reason: I am the author of this document
Date: 2016.01.22 13:24:51 +05'30'

म. बा. हजारी
उप सचिव

प्रत,

१) मा. प्रधान सचिव,महिला व बाल विकास विभाग यांचे वरिष्ठ स्विय सहायक,

२) आयुक्त, महिला व बाल विकास चर्च रोड, पुणे

३) संबधित जिल्हा महिला बाल विकास कार्यालय,ठाणे,पुणे,भंडारा,लातूर, बीड (आयुक्तांमार्फत)

४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र मुंबई/नागपूर

५) प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२ महाराष्ट्र मुंबई/नागपूर

६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालयामार्फत)

७) वित्त विभाग (व्यय-६/अर्थ-७/विनियम) वित्त विभाग,मंत्रालय,मुबई यांना माहितीसाठी

८) सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.

९) निवड नस्ती, कार्यासन ७ अ